## मे. दिवाणी न्यायाधीश साहेब क. स्तर यांचे न्यायालयात

## अंबाजोगाई

रे. दि. दा. /२०२६

Exh-9/D

**वादी : १) अमोल पि नागोराव घोडके**

वय : ४० वर्षे धंदा शेती

रा. सावता माळी चौक, अंबाजोगाई जिल्हा बीड

**२) संगीता भ्र. शिवाजी गायकवाड**

वय : ४५ वर्षे धंदा गृहिणी

रा. सावता माळी चौक, अंबाजोगाई जिल्हा बीड

**विरुद्ध**

**प्रतिवादी : मुख्याधिकारी साहेब**

नगर परिषद कार्यालय, अंबाजोगाई जिल्हा बीड

**प्रकरण :** चिरकाल मनाई हुकूम मिळणे बाबत.

**प्रस्तुतचे प्रकरणात वादी खालील प्रमाणे क. ३०४ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ प्रमाणे पाठविलेले नोटीस कालावधी क्षमापित करण्यासाठी अर्ज सादर आहेत**

१)हे की, वादी यांनी सदरचे प्रकरण प्रतिवादी नगरपरिषद अंबाजोगाई चे मुख्याधिकारी यांच्याविरुद्ध त्यांनी करत असलेल्या बेकायदेशीर रस्त्यावर अतिक्रमण करून वादीला कोणती पूर्व नोटीस न देता वादग्रस्त मिळकती जमीन सर्वे नंबर १७२/१ पैकी १ मधील क्षेत्रफळ १ एकर ६ आर अनधिकृतपणे

कोणत्याही प्रकारची सूचना अथवा नोटीस न देता वादी यांच्या ताबा व कब्जे उपभोगातील मिळकतीवर नगरपरिषद अंबाजोगाईतील कर्मचारी बेकायदेशीपणे अतिक्रमण करून खोदकाम करीत आहेत त्यामुळे वादीची कधीही न भरून येणारे अपरिमित असे नुकसान होत आहे यामुळे वादी यांनी प्रतिवादीविरुद्ध मा. न्यायालयात दाखल करीत आहेत व सदर दावा दाखल करण्यापूर्वी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३०४ अन्वये दावा दाखल करण्यापूर्वीची नोटीस प्रतिवादी यांना रजिस्टर पोस्टाने पाठवलेली आहे

२) हे की, सदर नोटीस पाठविल्यानंतर एक महिन्याचा कालावधी प्रतिवादी यांना सदर नोटीस चे उत्तर देण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेला आहे परंतु प्रकरणातील प्रतिवादी यांनी दिनांक १६/०२/२०२६ रोजी बेकायदेशीरपणे नवीन वाढीव रस्ता करण्यासाठी खोदकाम करण्याचा प्रयत्न केला तेव्हा वादी यांनी त्यांना विनंती केली की माझ्या मालकीच्या जमिनीच्या लेआउट प्रमाणे व आपण दिलेल्या पी टी आर प्रमाणे तालुका भूमी अभिलेख कार्यालय अंबाजोगाई यांच्याकडील मोजणी नकाशा प्रमाणे आपण काम करू शकता परंतु आपण दिलेल्या पी टी आर व गुंठेवारी लेआउट च्या विरुद्ध जाऊन बेकायदेशीर रित्या माझ्या जमिनीमध्ये अतिक्रमण करून रस्त्याची रुंदीकरण करत आहात त्यामुळे माझे पाच कोटी रुपयाचे नुकसान होत आहे अशा प्रकारे विनंती केली असता त्यांनी आम्ही पोलीस संरक्षण घेऊन सदरचा रस्ता करू असे नगर रचनाकार श्री अलोक देशमुख यांनी धमकी दिली यामुळे वादी यांना प्रतिवादी विरुद्ध तात्काळ दावा देणे भाग पडलेले आहे व सदर दाव्यामध्ये निशाणी पाच दिलेला असून वादीच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम मिळणे आवश्यक आहे जर तात्पुरता मनाई हुकूम वादीच्या हक्कात न मिळाल्यास वादीचे कधी न भरून येणारे नुकसान होणार आहे व प्रतिवादी यांना कायद्याने न्यायालयाची नोटीस गेल्यास एक महिन्याचा कालावधी हा त्याचे उत्तर देण्यासाठी आरक्षित

असून सदर कालावधीमध्ये प्रतिवादी हे बेकायदेशीरपणे अतिक्रमण करून वादीचे नुकसान करण्याची दाट शक्यता आहे यामुळे प्रतिवादी यांना दिलेली कलम 304 प्रमाणे चा कालावधी क्षमापित करून तात्काळ रजिस्टर करून घेण्यात यावा हे न्याय व योग्य आहे.

**तरी विनंती की**

सदरचा अर्ज मंजूर करून वादी क. ३०४ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ प्रमाणे पाठविलेले प्रतिवादी यांना नोटीस कालावधी क्षमापित करून दावा रजिस्टर्ड करण्यात येऊन उपकृत करण्यात यावा.

दिनांक १७/०२/२०२६

**वादी**

**१) अमोल पि नागोराव घोडके**

**२)संगीता भ्र. शिवाजी गायकवाड**

**मार्फत**

**ॲड. एस. व्हि. कुलकर्णी**